# महाराष्ट्र शासन
# आदिवासी विकास विभाग (खुद्द)
# मंत्रालय,मुंबई
# नागरिकांची सनद
# सन २०१८

# नागरिकांची सनद
# आदिवासी विकास विभाग - महाराष्ट्र राज्य

**प्रस्तावना**

प्रशासन लोकार्भिमुख होण्यासाठी तसेच शासनाच्या दैनंदिन कामकाजात पारदर्शकता आणुन आदिवासी विकास विभागाचे धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी नागरिकाची सनद (सिटीझन चार्टर) तयार केली आहे. जनतेला त्यांच्या कामांमध्ये होणारी गैरसोय टाळण्यासाठीया नागरिकाच्या सनदेची निर्मिती करण्यात आली असुन जनतेचे काम विहित मुदतीच्या आत करुन घेण्याचा हक्क ख-या अर्थाने या सनदेव्दारे प्राप्त होणार आहे. या सनदेव्दारे जनतेला चांगली सेवा देणे तसेच कायद्याची आणि नियमांची अंमलबजावणी संबंधित अधिका-याव्दारे करुन,पारदर्शक प्रशासनाची खात्री जनतेला देता येईल, अशा महत्वाच्या बाबींचा समावेश यात आहे.

शासनाकडुन जनतेला विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. परंतु त्या सेवांची पुरेपुर माहिती सर्वसामान्य जनतेला नसते. तसेच या सेवा कमीत कमी वेळेत मिळाव्यात, त्या दर्जेदार असाव्यात अशी जनतेची अपेक्षा असते. याबरोबरच शासकीय कामकाजात सुधारणा करणे, पारदर्शकता आणणे व भ्रष्टाचाराला आळा घालुन जनतेप्रती आपले उत्तरदायित्व जोपासणे, या उद्दिष्टांच्या पुर्ततेकरिता नागरिकांची सनद (सिटीझन चार्टर) तयार करण्यात आली आहे. विभागातील विविध स्तरावरील कार्यालयाकडुन जनतेला उपलब्ध् करुन देण्यात येणा-या विविध सेवांचा यात समावेश आहे.

**१) उद्दिष्टे**

सामान्य जनतेला कार्यक्षम यंत्रणा आणि आदिवासी विकास विभागाच्या योजनांची संपूर्ण माहिती देण्यास महाराष्ट्र शासन या सनदेव्दारे कटिबध्द आहे. आदिवासी विकास विभागाशी संबंधित कामे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडुन राबविण्यात येतात. तसेच आदिवासी विकास विभागाकडुन विविध योजना राबविल्या जातात. सदर योजना **परिशिष्ट “अ”** मध्ये दिलेल्या आहे.

**२) दृष्टिक्षेप (Vision)**

भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासुन संरक्षक करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने अनुसूचित जमातीचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणा कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभाग विविध विकास योजना राबवित आहे.

**३) उद्देश (Mission)**

प्रतिसाद देणारी, पारदर्शक आणि विद्वत्त संस्था, असा नावलौकिक प्रस्थापित करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडुन अनसूचित जमातीला अधिक संपन्न, विस्तृत आणि शाश्वतरित्या विकसित करण्याच्या हेतुने सर्व स्तरावर सकारात्मक हस्तक्षेपास उत्प्रेरणा देऊन विभागास अधिक क्रियाशील करणे.

**४) नियम / अधिनियम / शासन निर्णय**

या विभागाशी संबंधित नियम/ अधिनियम/ महत्वाचे शासन निर्णय https://tribal.maharashtra.gov.in या आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावर (वेबसाईट) उपलब्ध असुन ते नियमित अद्यावत करण्यात येतात.

**५) (अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी असल्यास त्यासंबंधी अपिलीय अधिका-याकडे तक्रार नोंदविता येईल. संबंधित अपिलीय अधिका-यांचे दुरध्वनी क्रमांक **परिशिष्ट "ब"** मध्ये देण्यात आले आहेत.

**(ब) नागरिकाच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन**

या नागरिकाच्या सनदेचा उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा आदिवासी विकास विभागाकडुन दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

**(क) जनसामान्यांकडुन सूचना**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य आणि यथोचित सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येतील. आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

**(६) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी**

आदिवासी विकास विभाग नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. आदिवासी विकास विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी प्रत्येक अधिकारी /कर्मचा-यांची राहील. आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावर तसेच प्रत्येक कार्यालयाकमध्ये नागरिकांच्या सनदेचे फलक लावून सनदेस व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासुन संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन पंचवार्षिक योजनामध्ये मागासवर्गीयांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याचे भौगोलीक क्षेत्र ३, ०७,७१३ चौ.कि.मी. एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. गेल्या चार दशकांतील राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी खाली देण्यात आली आहे.

| जनगणना वर्ष | राज्याची एकुण लोकसंख्या (लाखात) | आदिवासी लोकसंख्या (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९७१ | ५०४.१२ | ३८.४१ | ७.६२ |
| १९८१ | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९ |
| १९९१ | ७८९.३७ | ७३.१८ | ९.२७ |
| २००१ | ९६८.७९ | ८५.७७ | ८.८५ |
| २०११ | ११२३.७४ | १०५.१० | ९.३५ |

महाराष्ट्र राज्यात एकुण ४५ अनुसूचित जमाती आहेत त्यात मुख्यत्वे भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकुर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणुन अधिसुचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत.

राज्यात एकुण ३६ जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात धुळे, नंदुरबार, जळगांव, नाशिक व ठाणे व नवनिर्मित पालघर (सहयाद्री प्रदेश) चंद्रपुर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपुर, अमरावती, व यवतमाळ (गोडवन प्रदेश) या पुर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये मुख्यत: अधिक आहे.

१९७५-७६ या वर्षी भारत सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावांतील आदिवासी संख्या एकुण लोकसंख्येच्या ५० टक्याहुन अधिक असेल त्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले अशाप्रकारे १६ प्रकल्प होते. नंतर ज्या गावांमधील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्यापेक्षा किंचतशी कमी होती त्या गावांचा समावेशही अशा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला आणि अशी क्षेत्रे अतिरीक्त आदिवासी उपयोजना (एटीएसपी गट / प्रकल्प) म्हणुन ओळखण्यात येऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरीक्त अदिवासी उपयोजना प्रकल्प क्षेत्रे आहेत. तसेच आदिवासीची लोकसंख्येचे वाढते प्रमाण व मोठे कार्यक्षेत्र पाहता सध्या एकुण प्रकल्प अधिकाऱ्यांची संख्या २९ आहे.

दरम्यानच्या काळात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रालगतच्या प्रदेशातही काही ठिकाणी आदिवासींची वस्ती असल्याचे भारत सरकारच्या लक्षात आले. म्हणुन सुमारे १०,००० लोकवस्तीच्या गावांमध्ये आदिवासींची संख्या ५० टक्याहुन अधिक असेल तर अशा गावांचा समावेश सुधारीत क्षेत्र विकास खंडामध्ये (माडा) करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. त्याच प्रमाणे एकुण ५,००० लोकवस्तीच्या दोन किंवा तिन गावांमध्ये ५० टक्याहुन अधिक आदिवासींची संख्या असेल तर, त्या गावांचा समावेश मिनीमाडा क्षेत्रामध्ये करण्यात यावा, अशा सुचना आहेत. महाराष्ट्रामध्ये एकुण ४३ माडा क्षेत्रे आणि २४ मिनीमाडा क्षेत्रे आहेत.

आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्रशासन होण्याच्या दृष्टीने १९९२ मध्ये या विभागाची पुनर्रचना करण्यात आली. राज्यात आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे अधिपत्याखाली अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, अमरावती व नागपुर, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प २९ कार्यालय कार्यरत असुन त्यापैकी ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अत्यंत संवेदनशील म्हणुन घोषित करण्यात आली आहे. त्यामध्ये नाशिक, कळवण, तळोदा, जव्हार, डहाणु, धारणी, किनवट, पांढरकवडा, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे.

## आदिवासी उपयोजना

सन १९७५-७६ पासुन एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) सर्व मार्गानी मिळणा-या निधीचा विनियोग करण्यासाठी आदिवासी उपयोजना (टिएसपी) सुरु करण्याची कल्पना साकार होऊ लागली. परिणामी आदिवासी उपयोजना आणि आदिवासी विकास प्रकल्प या दोन्ही संज्ञा परस्परांकरिता समान अर्थाने वापरल्या जाऊ लागल्या आणि आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रातच आदिवासी उपयोजना क्षेत्र असे संबोधण्यात येऊ लागले.

राज्य शासनाने श्री. द. म. सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन सदर समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारल्या आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामुळे सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जनतेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशा आशयाची शिफारस सुकथनकर समितीने केली. सदर शिफारशीनुसार टप्प्या टप्प्याने ९ टक्के पर्यंत नियतव्यय उपलब्ध करुन द्यावयाचा होता. त्याप्रमाणे टप्पाटप्प्याने प्रतिवर्षी नियतव्ययात वाढ होऊन सन २००५-०६ पासुन सरासरी ९ टक्के नियतव्यय उपलब्ध होत आहे.

सदर योजनांसाठी कमाल मर्यादेच्या अधिन राहुन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे जिल्हयातील अंमलबजावणी अधिका-यांकडुन आदिवासी उपयोजना क्षेत्र व बाहय क्षेत्रात राबविण्याच्या योजनांचे प्रस्ताव मागवितात व संकलित प्रारुप आराखडा तयार करुन जिल्हा नियोजन मंडळापुढे मंजुरीसाठी सादर करतात. याप्रमाणे प्रत्येक जिल्हा नियोजन मंडळाने मंजूर केलेला जिल्हानिहाय प्रारुप आराखडा संकलीत करुन राज्याची जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तयार होते. सदर योजनेत योजनानिहाय प्रस्तावित नियतव्ययास मंजूरी मिळाल्यानंतर मंजूर नियतव्यय अर्थसंकल्पीत करुन प्रत्येक विभागास मागणीप्रमाणे आदिवासी विकास विभाग तरतुद उपलब्ध करुन देते. त्याप्रमाणे संबंधित विभागाकडुन

मार्गदर्शक सुचनाप्रमाणे खर्च करण्यांत येतो व खर्चाचा मासिक प्रगती अहवाल आदिवासी विकास विभागास सादर केला जातो.

आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय योजना राबविण्यात येत होत्या. सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर २०१० पासुन आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक टिएसपी-२००८/प्र.क्र.६/का-६, दिनांक १६ डिसेंबर २००९ अन्वये आदिवासी उपयोजना जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती अंमलात आली आहे.

वरील शासन निर्णयान्वये सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासुन आदिवासी उपयोजनेच्या जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पीत करुन, वितरीत करणे व त्यामधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन यापुढे आदिवासी उपयोजनेखालील जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पीत करणे, तरतुदीचे वितरण व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, तसेच पुर्नविनियोजन करणे इत्यादीबाबत सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहे.

सदरच्या योजना आदिवासींना वैयक्तिक लाभ देणा-या आणि आदिवासींना सामुहिक तसेच क्षेत्रविकास करण्यांकरिता योजना राबविण्यांत येतात. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेअंतर्गत राज्यातील विविध प्रशासनिक विभागामार्फत अनेकविध योजना राबविण्यांत येतात. त्यांचे मुख्यत्वे ९ विकासशिर्ष आहेत ते पुढीलप्रमाणे,

१. कृषी व संलग्न सेवा
२. ग्रामीण विकास
३. विशेष क्षेत्रीय कार्यक्रम
४. पाटबंधारे व पुरनियंत्रण
५. विद्युत विकास
६. उद्योग व खनिजे
७. वाहतुक व दळणवळण
८. सामान्य आर्थिक सेवा
९. सामाजिक व सामुहिक सेवा.

### आदिवासी विकास विभागाची रचना

शासन स्तरावर मा.मंत्री (आदिवासी विकास विभाग), तसेच मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास विभाग) यांच्या अधिपत्याखाली मा. प्रधान सचिव/ सचिव (आदिवासी विकास विभाग) हे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आहेत. शासन स्तरावर अनुसूचित जमातीकरिता विविध धोरणात्मक निर्णय, अर्थसंकल्प इत्यादी बाबी हाताळल्या जातात.

**प्रशासकीय घटक** : आदिवासी विकास आयुक्तालयांचे क्षेत्रीय प्रमुख आयुक्त, आदिवासी विकास आहे. त्यांचे अधिनस्त राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात ४ प्रादेशिक अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे स्तरावर विभागले असुन त्यांचे प्रमुख भारतीय प्रशासन सेवा या दर्जाचे अधिकारी आहेत. प्रादेशिक कार्यालयाचे विभाजन केलेले असुन २९ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अशी विभागणी करण्यात आलेली आहे.

### आदिवासी विभाग मंत्रालयीन रचना



# आदिवासी विकास विभाग (Organisation Chart)

- मंत्री, आदिवासी विकास विभाग
  - राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग
    - प्रधान सचिव, आदिवासी विकास
      - आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संसथा, पुणे
        - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे
        - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे
        - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक
        - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदुरबार
        - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद
        - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती
        - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर
        - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली
      - व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक
      - शबरी आदिवासी वित्त महामंडळ, नाशिक
      - आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य , नाशिक
        - अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., जव्हार
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., डहाणू
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., शहापूर
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., घोडेगांव
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., पेण
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., सोलापूर
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., मुंबई
        - अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., नाशिक
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., कळवण
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., तळोदा
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., यावल
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., राजूर
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., नंदुरबार
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., धुळे
        - अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., किनवट
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., धारणी
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., पांढरकवडा
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., कळमनूरी
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., औरंगाबाद
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., पुसद
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., अकोला
        - अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., गडचिरोली
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., अहेरी
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., भामरागड
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., देवरी
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., चिमूर
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., चंद्रपुर
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., भंडारा
          - प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., नागपुर

## परिशिष्ट-“अ”

## आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना

| अ.क्र | योजनेचे नाव |
|---|---|
| (१) | शासकीय आश्रमशाळा समूह योजना |
| (२) | स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य |
| (३) | शासकीय आश्रमशाळेत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे |
| (४) | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे. |
| (५) | पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयम् योजना |
| (६) | आदिवासी मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे |
| (७) | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना |
| (८) | राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक शुल्कांच्या प्रतिपूर्तीबाबत |
| (९) | व्यावसायिक पाठयक्रमात शिकणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे |
| (१०) | महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी एकलव्य मॉडेल निवासी शाळा योजना |
| (११) | सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना |
| (१२) | अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे. |
| (१३) | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) |
| (१४) | मोटार वाहनचालक प्रशिक्षण केंद्र योजना |
| (१५) | सैन्य व पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण योजना |
| (१६) | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना |
| (१७) | केंद्र शासन सहाय्य योजना |
| (१८) | अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी |
| (१९) | आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-या सामाजिक कार्यकर्त्यांना संस्थांना आदिवासी सेवक/ सेवा संस्था पुरस्कार. |
| (२०) | राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना राबविणे |
| (२१) | भूमिहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासीचे सबळीकरण व स्वाभिमान योजना |
| (२२) | ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम |
| (२३) | शबरी आदिवासी घरकुल योजना |
| (२४) | पारधी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुल योजना |
| (२५) | भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना |
| (२६) | भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-२ |

| आदिवासी विकास विभाग<br>मंत्रालय मुख्य दूरध्वनी क्रमांक - २२०२४२४३ | | | | |
|---|---|---|---|---|
| फॅक्स क्रमांक (१) २२८३३६६५ (२) २२०४८७९०<br>ईमेल- tribal.info@nic.in | खोली क्रमांक | दूरध्वनी क्रमांक | | |
| | | कार्यालय | निवास | भ्रमणध्वनी |
| **श्री. विष्णु रामा सवरा,**<br>मा. मंत्री, आदिवासी विकास | २०७ | २२०२५३६०<br>२२०२४९५० | सागर<br>२३६३०३४४ | ९४२२०७७२९३ |
| **श्री. राजे अम्ब्रीशराव राजे सत्यवानराव अत्राम**<br>मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास | २४१ | २२८८६०९०<br>२२८४३७४१ | बी-५<br>२२०२००९७<br>२२८८००८३ | ९४२२५५५६७८ |
| **श्रीम. मनिषा वर्मा (भा.प्र.से.)**<br>प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | १३५<br>(विस्तार) | १) २२०२६७४२ - पी. ए.<br>२) ३७७८ (विस्तार)<br>३) २२८५२६४३ | | -- |

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | कार्यासन क्रमांक | | खोली क्रमांक | दूरध्वनी क्रमांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विस्तार | कार्यालय | भ्रमणध्वनी |
| १ | **श्री.सुनिल पाटील (भा.प्र.से.)**<br>**सह सचिव** | **७,९,१४,१५,१७,१८ व १९** | | १३१ | ३५७८ | २२०२१२३९ | ९८१९८१४८४० |
| २ | **श्री. सु. ना. शिंदे**<br>**उप सचिव** | **१, २, ६, ६ अ, ११, १२, १३ व रोखशाखा** | | | ३५३७ | २२०२३३७७ | ९८६९२८५१८५ |
| ३ | **श्री. ल. गो. ढोके**<br>**उप सचिव** | **३, ५, ८, १०, १६, व संगणक कक्ष** | | | ३६७५ | २२०२५०९४ | ९८१९१७७६४० |
| ४ | **श्री. रा. क. खटके** | मुख्य अभियंता | **बां.व्य. क.** | १४९ (ए) | -- | २२०२३१४७ | ९९२३११०१४८ |
| ५ | **श्रीमती सु.वि.गायकवाड** | कक्ष अधिकारी | **१** | १३४ | ३०३१ | २२७९ ३०३१ | ७७७५९९९८०६ |
| ६ | **श्री.रा.दे.भवारी** | कक्ष अधिकारी | **२** | १३१ | -- | २२०२३३७७ | |
| ७ | **श्री. ल.रं.धायगुडे** | कक्ष अधिकारी | **३** | एम-५(ए) | ३८८७ | २२७९ ३८८७ | ८०९७९०६१११ |
| ८ | **श्री. ज. ज. सरोदे** | अवर सचिव (विधी) | **४** | १३१ | ४१३० | २२०२३३७७ | ९३२१७७०७८२ |
| ९ | **श्री. स.वि.कोवे** | कक्ष अधिकारी | **५** | एम-५(बी) | ३०३० | २२०४७१५६ | ९७६९०३४५२५ |
| १० | **श्री. र. दि. औटे** | कक्ष अधिकारी | **६** | एम-५(ए) | ३७७९ | २२०४७१४५ | ९०९६३८०७७२ |
| ११ | **श्री. कि. कि. पवार** | अवर सचिव | **६ अ** | एम-५(ए) | ३७७९ | २२०४७१४५ | ९८६७३१५६८९ |
| १२ | **श्री.यो.अ.सावंत** | कक्ष अधिकारी | **७** | १३४ | ३८८८ | २२७९ ३७१४ | ९८६९२०८९४८ |
| १३ | **श्री.नि.अ.पांढरकामे** | अवर सचिव | **८** | एम-५(ए) | ३७१४ | २२७९ ३८८८ | ९९८७१४८७३३ |
| १४ | **श्री.प्र.वाझे** | कक्ष अधिकारी | **९** | एम-५(ए) | ३७१४ | २२७९ ३७१४ | ७३८७५७३०४० |
| १५ | **श्री. सु. सि. पाटील** | कक्ष अधिकारी | **१०** | १३४ | ३८८८ | २२७९ ३८८८ | ७५८८८१५८३९ |
| १६ | **श्री. अ. घ. पाठक** | कक्षअधिकारी | **११** | १३४ | ३०२९ | २२७९ ३०२९ | ८१४९९२४६१३ |
| १७ | **श्री.दु.पो.मैलावरम** | अवर सचिव | **१२** | एम-५(बी) | ३०३० | २२०४७१५६ | ९००४४७६३३६ |
| १८ | **श्री. बा. रा. सोनवणे** | कक्ष अधिकारी | **१३** | १३४ | ३०२९ | २२०४७१४४ | ९९७०८०४०६४ |
| १९ | **श्री. पां. म. राऊत** | कक्ष अधिकारी | **१४** | १३३ | ४१२९ | २२०४८७९० | ९८६९३१५३२३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | **श्री.गो.म.माईणकर** | अवर सचिव | **१५** | १३४ | ३०२९ | २२०४८७८९ | ९९६७४३९२५२/ ९६६४५८२३२३ |
| २१ | **श्री. सं. शि. जाधव** | कक्ष अधिकारी | **१६** | एम-५(बी) | ३०३० | २२०४७१५६ | ९८६७७९७७७६ |
| २२ | **श्री. ग. रा. देशमुख** | कक्ष अधिकारी | **१७** | एम-५(ए) | ४१२९ | २२७९ ४१२९ | ९५९४०४९२४९ |
| २३ | **श्री.भि.ओं.ठाकूर** | नोंदणी शाखा प्रमुख | **१८** | एम-५(ए) | ३७१४ | २२७९३७१४ | ९९६९५६३८७० |
| २४ | **श्री.अ.र.राजपूत** | कक्ष अधिकारी | **१९** | एम-५(ए) | ४१३२ | २२७९ ४१३२ | ९८२०४२२८२५ |
| २५ | **श्री.कि.म. शार्दुल** | कक्ष अधिकारी | **सं.क.** | १३१ | ४१३१ | २२०२३१४७ | ९८२०२६७७२६ |
| २६ | **श्री.श्री. वि. सुर्वे** | लेखा अधिकारी | **रो.शा.** | १३१ | ४१३१ | २२७९ ४१३१ | ९९६७०४७४११ |

************

## आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे दुरध्वनी क्रमांक

| | पदनाम | एसटीडी | कार्यालय | फॅक्स | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा. आयुक्त | | २५७७५१० | | |
| २ | उप आयुक्त (प्रशासन) | | २५७४२३५ | | |
| ३ | उप आयुक्त (विकास) | | | | |
| ४ | उप आयुक्त (शिक्षण) | | | | |
| ५ | सहा.आयुक्त (विकास) | ०२५३ | २५७५६१५ | २५७९२०८ | ctd.nsk-mh@gov.in, |
| ६ | स.प्र.अ. (आस्थापना) | | | | |
| ६ | सहा.प्र.अ.(बांधकाम) | | | | |
| ७ | सहा.प्र.अ.(विकास) | | | | |
| ८ | सहा.प्र.अ.(नियोजन) | | | | |
| ९ | सप्रअ (शिक्षण-अनु) | | | | |
| १० | सप्रअ (शिक्षण-शास) | | | | |
| ११ | लेखा अधिकारी (ऑ) | | | | |
| १२ | लेखा अधिकारी | | | | |
| १३ | मुख्य समन्वयक (वनकायदा) | | | | |

## अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे दुरध्वनी क्रमांक

| | विभाग | एसटीडी | कार्यालय | फॅक्स | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३ | २५७५८१६ | | atc.nsk-mh@gov.in, |
| | | ०२५३ | २५७७०४५ | | |
| २ | ठाणे | ०२२ | २५८२३५२८ | २५८३३८२२ | atc.thane-mh@gov.in, |
| | | ०२२ | २५८००६३७ | | |
| ३ | अमरावती | ०७२१ | २५५३९६८ | २५५३९६८ | atc.amr-mh@gov.in, |
| | | ०७२१ | २५५३९६६ | | |
| ४ | नागपूर | ०७१२ | २५६०१२७ | २५६५००८ | atc.ngp-mh@gov.in, |
| | | ०७१२ | २५६०३१४ | | |

## प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे दुरध्वनी क्रमांक

| क्र. | प्रकल्प | एसटीडी | कार्यालय | फॅक्स | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३ | २५७७४१० | | poitdp.nsk-mh@gov.in, |
| २ | कळवण | ०२५९२ | २२१०८४ | २२१६१५ | poitdp.kalwan-mh@gov.in |
| ३ | धुळे | ०२५६२ | २४०९५५ | २३७०४९<br>२४०९५५ | poitdp.dhule-mh@gov.in, |
| ४ | नंदूरबार | ०२५६४ | २२२३०३ | २२२३०३ | poitdp.ndb-mh@gov.in, |
| ५ | तळोदा | ०२५६७ | २३२२२० | २३२२२० | poitdp.taloda-mh@gov.in |
| ६ | यावल | ०२५८५ | २६१४३२ | २६२०३५ | poitdp.yawal-mh@gov.in |
| ७ | राजूर | ०२४२४ | २५१०३७ | २५१०८५ | poitdp.rajur-mh@gov.in, |
| ८ | शहापुर | ०२५२७ | २७२१५७ | २७२०४८ | poitdp.shahapur-mh@gov.in, |
| ९ | जव्हार | ०२५२० | २२२४१३ | २२२४१३ | poitdp.jawhar-mh@gov.in |
| १० | डहाणू | ०२५२८ | २२२०६६ | २२३४६९ | poitdp.dahanu-mh@gov.in |
| ११ | घोडेगांव | ०२१३३ | २४४२६६ | २४४२७७ | poitdp.ghodegaon-mh@gov.in |
| १२ | सोलापूर | ०२१७ | २६०७६०० | | poitdp.solapur-mh@gov.in |
| १३ | पेण | ०२१४३ | २५२५१९/२५२४१७ (कॅ) | २५४५६९ | poitdp.pen-mh@gov.in |
| १४ | मुंबई | ०२२ | २८६५४०२३ | २८०८५६१९ | poitdp.mum-mh@gov.in |
| १५ | धारणी | ०७२२६ | २२४२१७ | २२४२१७ | poitdp.dharni-mh@gov.in, |
| १६ | अकोला | ०७२४ | २४२५०६८ | २४२९४३७ | poitdp.akola-mh@gov.in, |
| १७ | पुसद | ०७२३३ | २४९५४६/२४९५४७ | २४४३४० | poitdp.pusad-mh@gov.in, |
| १८ | पांढरकवडा | ०७२३५ | २२७४३६ | २२८८२१ | poitdp.pkwada-mh@gov.in, |
| १९ | किनवट | ०२४६९ | २२२०१५ | २२२०१५ | poitdp.kinwat-mh@gov.in, |
| २० | कळमनूरी | ०२४५५ | २२०३३३/२२०१२३ | २२०१२३ | poitdp.knuri-mh@gov.in, |
| २१ | औरंगाबाद | ०२४० | २४८६०६९ | २४८६०६९ | poitdp.abd-mh@gov.in, |
| २२ | नागपूर | ०७१२ | २५६०७२६ | २५६४५३८ | poitdp.ngp-mh@gov.in, |
| २३ | चंद्रपूर | ०७१७२ | २५१२७० | २५६२५५ | poitdp.chandrapur-mh@gov.in, |
| २४ | चिमूर | ०७१७० | २६५५२४ | २६६४९८ | poitdp.chimur-mh@gov.in, |
| २५ | देवरी | ०७१९९ | २२५१४४ | २२५०६७ | poitdp.deori-mh@gov.in, |
| २६ | भंडारा | ०७१८४ | २५१२३३ | २५६०२१ | poitdp.bhandara-mh@gov.in, |
| २७ | गडचिरोली | ०७१३२ | २२२२८६ | २२२२८६ | poitdp.gchiroli-mh@gov.in, |
| २८ | अहेरी | ०७१३३ | २७२०३१ | २७२०३१ | poitdp.aheri-mh@gov.in, |
| २९ | भामरागड | ०७१३४ | २६६१६६ | २६६७१६ | poitdp.bgad-mh@gov.in |

## अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे पत्ते, दूरध्वनी व फॅक्स क्रमांक

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११ ००१.

दु.क्र.०२०-२६३३०८५४/२६३६२०७१/२६३६०९४१/२६३६२७७२/२६३३३७४३/२६३३०२३०/२६३३२३८०

फॅक्स-०२०-२६३६००२६ : e-mail - trti.mah@nic.in

Website address –( www.trti.maharashtra.gov.in )

| अ.क्र. | समितीचा पत्ता | महसूल विभाग | दूरध्वनी/फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>तिसरा मजला, वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, कोरस कंपनीच्यासमोर, वर्तकनगर, ठाणे (प.)- ४००६०६. | कोकण विभाग<br>मुंबई शहर, मुंबई उपनगर,ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग | Tel & Fax : ०२२- २५८८३५०३<br>e-mail : tcsctha.mah@nic.in |
| २ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>२८, क्वीन्स गार्डन, पुणे -४११ ००१. | पुणे विभाग<br>पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर | Tel : ०२०- २६३३६९६१<br>Fax : ०२०- २६३६००२६<br>e-mail : tcscpun.mah@nic.in |
| ३ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड,<br>नाशिक - ४२२ ००२. | नाशिक विभाग<br>नाशिक, अहमदनगर | Tel & Fax : ०२५३- २५७७०५९<br>e-mail : tcscnsk.mah@nic.in |
| ४ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>नंदुरबार दुध शीतकरण केंद्राची इमारत,<br>R.T.O. ऑफीस शेजारी, साखरी रोड,<br>नंदुरबार - ४२५ ४१२. | नाशिक विभाग<br>धुळे, नंदुरबार, जळगांव | Tel : ०२५६४-२१०१३०<br>e-mail : cvcndb@gmail.com |
| ५ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>प्लॉट नं.१०, सेक्टर ई-१, सेट लॉरेन्स इंग्लीश स्कूजवळ, सिडको बस स्टँडसमोर, सिडको टाऊन सेंटर, औरंगाबाद-४३१ ००३. | औरंगाबाद विभाग<br>औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली | Tel & Fax : ०२४०-२३६२९०१<br>e-mail : tcscaur.mah@nic.in |
| ६ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>देशमुख बिल्डिंग, मोर्शी रोड,<br>सेवायोजन कार्यालयासमोर, इर्विन चौक,<br>अमरावती-४४४ ६०१. | अमरावती विभाग<br>बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ | Tel & Fax : ०७२१-२५५०९९१<br>e-mail : tcscamr.mah@nic.in |
| ७ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>आदिवासी विकास भवन, गिरीपेठ,<br>अमरावती रोड, नागपूर -४४० ०१०. | नागपूर विभाग<br>वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, | Tel & Fax : ०७१२-२५६००३१<br>e-mail : tcscngp.mah@nic.in |
| ८ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>जिल्हा परिषद वसाहत, कॉम्प्लेक्स एरिया,<br>गडचिरोली -४४२ ६०५. | नागपूर विभाग<br>चंद्रपूर, गडचिरोली | Tel : ०७१३२-२२३१७९/२२३१८०<br>e-mail : tcscgad@yahoo.in |

# आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
## नागरिकांची सनद

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय आश्रमशाळा समूह योजना | संबधीत शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य | प्रवेश-<br>१. दि. १ जुन ते १५ जुन पर्यंत पटनोंदणीतील पात्र विद्यार्थ्यांना इ. १लीत प्रवेश देणे<br>२. दि.११ जुन ते १५ जुन पर्यंत इ. २ री ते १० वीत प्रवेश देणे<br>३. त्यानंतरही जागा रिक्त राहिल्यास प्रकल्प अधिका-यांच्या मान्यतेने रिक्त जागेच्या मर्यादेत अर्ज स्विकृती करुन प्रवेश देण्यात येईल. | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| २. | स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य | संबधीत अनुदानित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य | प्रवेश-<br>१. दि. १ जुन ते १५ जुन पर्यंत पटनोंदणीतील पात्र विद्यार्थ्यांना इ. १लीत प्रवेश देणे<br>२. दि.११ जुन ते १५ जुन पर्यंत इ. २ री ते १० वीत प्रवेश देणे<br>३. त्यानंतरही जागा रिक्त राहिल्यास प्रकल्प अधिका-यांच्या मान्यतेने रिक्त जागेच्या मर्यादेत अर्ज स्विकृती करुन प्रवेश देण्यात येईल. | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| ३. | शासकीय आश्रमशाळेत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे | संबधीत शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य | जागेच्या उपलब्धतेनुसार शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर १० दिवसांच्या आत प्रवेश दिला जाईल. तदनंतरही जागा रिक्त राहिल्यास प्रकल्प अधिकारी यांचे मान्यतेने प्रवेश दिला जाईल. | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| ४. | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळामध्ये शिक्षण देणे | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | जागेच्या उपलब्धतेनुसार शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत प्रवेश दिला जाईल. | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | पात्र लाभार्थ्यांना-<br>• शैक्षणिक साहित्याकरीता देय रक्कम वर्षाच्या सुरुवातीस एकदाच देण्यात येईल.<br>• निवास व भोजन याकरीताची देय रक्कम त्रैमासिक देण्यात येईल. | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| ६ | आदिवासी मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृहे | संबधीत गृहपाल, शासकीय वसतिगृह | प्रवेश:-<br>१. विद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दि.२६ मे ते ३१ मे अखेर पर्यंत अर्ज छाननी व १ जुन ते १० जुन पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश<br>२. कनिष्ठ महाविद्यालयीन ( इ.११ वी ) विद्यार्थ्यांसाठी दि.२६ जून ते ३० जून अर्ज छाननी व १ ते १० जुलै पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश<br>३. महाविद्यालयीन( प्रथम वर्ष ) विद्यार्थ्यांसाठी २१ जुन ते २५ जुन पर्यंत अर्ज छाननी व २६ जुन ते ३० जुन पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश<br>४. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सदर मुदत प्राप्त अभ्यासक्रमाचे निकालावर अवलंबून राहील. | संबंधीत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी |
| ७ | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती ( भारत सरकार शिष्यवृत्ती ) योजना | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | परिपुर्ण अर्ज प्राप्तीनंतर निधीच्या उपलब्धतेनुसार वरील अनुज्ञेय सेवा पुरविली जाते. त्याचा सर्वसाधारण कालावधी खालील प्रमाणे असेल.<br>• महाविद्यालयात अर्ज सादर करणे -३१ जुलै<br>• महाविद्यालयाने प्रकल्प अधिका-यांना १५ ऑगस्ट पर्यंत अर्ज सादर करणे.<br>• प्रकल्प अधिका-यांकडून छाननी -१५ सप्टेंबर पर्यंत<br>• विद्यार्थ्यांच्या बँक खातेवर जमा करणे-३० सप्टेंबर पर्यंत<br>• मात्र ज्या विद्यार्थ्यांचे उशिरा निकालामुळे प्रवेश उशिरा होतील त्यांनी वरील मुदतीमध्ये १ | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | महिन्याची वाढ अनुज्ञेय राहील.<br>• तदनंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक महिन्यात निर्वाह भत्ता विद्यार्थीच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. | |
| ८ | राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शेक्षणिक शुल्कांच्या प्रतिपूर्तीबाबत | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | परिपूर्ण अर्ज प्राप्ती नंतर १० दिवसांच्या आत महाविद्यालयाच्या बँक खात्यात शिक्षण शुल्क , परिक्षा शुल्क जमा करणे- ३० सप्टेंबर पर्यंत | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| ९ | व्यावसायिक पाठयक्रमात शिकणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | • महाविद्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करणे -३१ जुलै<br>• महाविद्यालयाने प्रकल्प अधिका-यांना १५ ऑगस्ट पर्यंत अर्जासह प्रस्ताव सादर करणे.<br>• प्रकल्प अधिका-यांकडून छाननी -१५ सप्टेंबर पर्यंत<br>• निधी विद्यार्थ्यांच्या बँक खातेवर जमा करणे-३० सप्टेंबर पर्यंत<br>• मात्र ज्या विद्यार्थ्यांचे उशिरा निकालामुळे प्रवेश उशिरा होतील त्यांनी वरील मुदतीमध्ये १ महिन्याची वाढ अनुज्ञेय राहील. | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| १० | महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी एकलव्य मॉडेल निवासी शाळा योजना | मुख्याध्यापक / प्राचार्य | परिक्षेचा निकाल लागल्यानंतर उपलब्ध जागेनुसार संबधीत एकलव्य निवासी शाळांच्या प्राचार्यामार्फत प्रवेश देण्यात येईल. | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| ११ | सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | • मुख्यध्यापकांनी अर्जाची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांचे एकत्रित अर्ज गट शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे सादर करणे.<br>• प्रवेशानंतर पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांना बँकेत खाते उघडण्याबाबत सूचित करणे | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | अर्ज प्राप्ती - माहे जुलै मध्ये जाहिरातीनुसार २१ दिवसात<br>अर्जाची छाननी करणे - माहे जून पर्यंत<br>अंतिम यादी करणे - माहे जुलै पर्यंत<br>राज्यस्तरीय समितीची बैठक शासनास प्रस्तावित करणे<br>शिष्यवृत्ती - माहे ऑगस्ट पर्यंत<br>मागील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे नुतनीकरण - माहे संप्टेंबर अखेरपर्यंत. | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| १३ | केंद्रवर्ती अर्थसंकल्प ( न्युक्लिअस बजेट ) | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | अर्ज प्राप्त झाल्यापासून व परिपुर्ण कागदपत्रासह सहा महिन्याच्या कालावधीत<br>१. योजनांच्या आराखडयास मंजूरी मिळाल्यानंतर इच्छुक उमेदवार व संस्थांकडून अर्ज मागविणे, छाननी अंती लाभार्थी व संस्था निश्चीत करणेकरिता - **१५ दिवस**<br>२. ज्येष्ठता यादी व योजनानिहाय लाभार्थी यादी निश्चीत करणे, संस्था व लाभार्थी निवड यादीस मान्यता देणे- **२५ दिवस**<br>३. प्रत्यक्ष योजनेचा लाभ देण्यास योजनेच्या स्वरुपानुसार **१ ते ६ महिन्याचा कालावधी** | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| १४ | मोटार वाहनचालक प्रशिक्षण केंद्र योजना | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | माहे मार्च अखेर व सप्टेंबर अखेर अर्ज स्विकृती<br>अर्जाची तपासणी आर्थिक वर्षात - **३० एप्रिल पर्यंत**<br>परिपूर्ण अर्जाची यादी अंतिम करणे - **३० जुन**<br>प्रशिक्षणासाठी प्राप्त अर्जाच्या अनुक्रमांकानुसार निवड यादी जाहीर करणे - **३० जुलै** | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |

<table>
<tr><td>१५</td><td>सैन्य व पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण योजना</td><td>संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय</td><td><table>
<tr><td>अर्ज प्राप्त झाल्या पासून</td><td>मार्च</td><td>जुलै</td><td>नोव्हेंबर</td></tr>
<tr><td>अर्जाची तपासणी</td><td>एप्रिल</td><td>ऑगस्ट</td><td>डिंसेबर</td></tr>
<tr><td>परिपूर्ण अर्जाची यादी अंतिम करणे</td><td>मे</td><td>सप्टेंबर</td><td>जानेवारी</td></tr>
<tr><td>निवड यादी जाहीर करणे</td><td>जुन</td><td>ऑक्टोंबर</td><td>फेब्रुवारी</td></tr>
<tr><td>प्राप्त अर्जाच्या दिनांकास ज्येष्ठतेनुसार उमेदवार निवड</td><td>जुलै</td><td>नोव्हेंबर</td><td>मार्च</td></tr>
</table></td><td>संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर</td></tr>
<tr><td>१६</td><td>व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना</td><td>संबधीत मुख्याध्यापक , शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळा / मुख्य निर्देशक , व्यवसाय प्रशिक्षण केंद्र</td><td>अर्ज प्राप्त झाल्यापासून व परिपूर्ण कागदपत्रासह प्रत्येक चार महिन्याचा अभ्यासक्रम सुरु होण्यापुर्वी निवड यादी जाहीर करणे</td><td>संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय</td></tr>
<tr><td>१७</td><td>केंद्र शासन सहाय्य योजना</td><td>संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय</td><td>योजनेस शासनाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर परिपूर्ण कागदपत्र प्राप्तीनंतर तीन महिन्यात सेवा पुरविली जाईल</td><td>संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर</td></tr>
<tr><td>१८</td><td>अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी</td><td>संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय</td><td>अर्ज प्राप्त झाल्यापासून व परिपूर्ण कागदपत्रासह त्याच दिवशी अथवा दुसरे दिवशी कार्यालयीन वेळेत</td><td>संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर</td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | आदिवासी क्षेत्रात उल्लेखनिय काम करणा-या सामाजिक कार्यकर्त्यांना संस्थांना आदिवासी सेवक / सेवा संस्था पुरस्कार | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | अर्ज प्राप्त करणे - जुलै अखेर<br>त्रुटीबाबत कळविणे - ऑगस्ट<br>त्रुटी पुर्ततेनंतर प्राप्त प्रस्तावांची यादी तयार करुन वैयक्तिक माहिती तपशील तयार करणे - ऑक्टोंबर<br>अद्यावत यादी शासनास सादर करणे - १५ नोव्हेंबर<br>अंतिम पूर्तता - २९ नोव्हेंबर | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| २० | राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना राबविणे | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | अर्जाची छाननी - जुन अखेर<br>अर्जाची यादी अंतिम करणे - ऑगस्ट अखेर<br>प्रत्यक्ष लाभ देणे - नोव्हेंबर अखेर | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| २१ | भूमिहिन दारिद्रय रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | अर्जाची छाननी - जुन अखेर<br>अर्जाची यादी अंतिम करणे - ऑगस्ट अखेर<br>प्रत्यक्ष लाभ देणे<br>महसूल विभागामार्फत - नोव्हेंबर अखेर | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| २२ | ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | प्रस्तावित कामाचा ठराव व लोकसंखेचा दाखला प्रकल्प अधिकारी यांचे पाठविणे - **एप्रिल अखेर**<br>मागणीप्रमाणे सर्व गावांचा एकत्रित वार्षिक आराखडा करणे व अपर आयुक्त कार्यालयास सादर करणे - **१५ मे अखेर**<br>अपर आयुक्तांनी आराखडा मान्य करणे - **२० मे**<br>आदिवासी विकास निरीक्षकामार्फत स्थान भेट देऊन अहवाल प्राप्त करणे - **१५ जुन पर्यंत गावाच्या आदिवासी लोकसंख्येच्या आधारावर**<br>वित्तीय मर्यादेत प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यता घेणेसाठी संबधीत यंत्रणेस अंदाजपत्रक पाठविणे- **३० जुन पर्यंत**<br>प्राप्त अंदाजपत्रक जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करणे- **३१ ऑगस्ट पर्यंत** | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | जिल्हाधिकारी यांनी संबधित यंत्रणेच्या नावे सदर मंजूर कामास प्रशासकीय मान्यता देऊन त्यांचे नावे निधी उपलब्ध करुन देणे. | |
| २३ | शबरी आदिवासी घरकूल योजना | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | परिपूर्ण अर्ज प्राप्तीनंतर/त्रुटीर्पुततेनंतर १ महिना | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| २४ | पारधी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुल योजना | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय | परिपूर्ण अर्ज प्राप्तीनंतर/त्रुटीर्पुततेनंतर १ महिना | संबधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर |
| २५ | भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-१ | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना | अंगणवाडी व मिनी अंगणवाडी मधील गर्भवती व स्तनदा माता यांना एक वेळेचा चौरस आहार देण्यात येतो. | संबंधीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ( बा.क.) जिल्हा परिषद |
| २६ | भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-२ | संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना | ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अतिरिक्त आहार ( अंडी / केळी ) आठवडयातून चार दिवस देण्यात येतो | संबंधीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ( बा.क.) जिल्हा परिषद |

***********